# PRESS CLIPPING

**VIKRAM SOLAR**

2016

DATE: 22 November 2016 PUBLICATION: Aaple Mahanagar PAGE NO.: 09

आपलं महानगर

# विक्रम सोलरचा आयआयईएसटीसह सामंजस्य करार

● मुंबई । प्रतिनिधी

विक्रम सोलर ही जागतिक आघाडीची सौर उर्जा उत्पादने पुरवठादार कंपनी असून तिने भारत सरकारच्या यादीनुसार राष्ट्रीय महत्त्वाच्या असलेल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयरिंग सायन्स अँड टेक्नॉलॉजीशी (आयआयईएसटी) सामंजस्य करार केल्याची घोषणा केली. आयआयईएसटी ही भारत सरकारच्या न्यू अँड रिन्यूएबल एनर्जी (एमएनआरई) मंत्रालयातर्फे सेंजर ऑफ एक्सलन्स मान्यता मिळालेल्या संस्थांपैकी एक आहे. ही घोषणा राष्ट्रपती भवनात भारताचे राष्ट्रपती श्री. प्रणब मुखर्जी यांच्या उपस्थितीत औद्योगिक-शैक्षणिक सहकार्याविषयी सीआयआयबरोबर आयोजित करण्यात आलेल्या सत्रात केली गेली.

करारानुसार दोन्ही कंपन्या सोलर फोटोव्होल्टेक क्षेत्रातील उद्योग व शिक्षणाला पूरक ठरणारे संशोधन तसेच विकासाचे काम एकत्रितपणे हाती घेणार आहेत. या दोन्ही कंपन्या एकत्र येऊन देशासमोरील निकडीच्या गरजा भागवण्यासाठी संशोधन व विकास क्षेत्रात (नॉलेज जनरेशन, नो हाउ अपडेट, तंत्रज्ञानाचा वापर, यंत्रणेचा विकास, नव्या तंत्रज्ञानाचे स्त्रोत, वापरयोग्य संशोधन इत्यादी) काम करणार असून त्यासाठी सोलर फोटोव्होल्टेकवर परिषदा व प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल, ज्यामध्ये आयआयईएसटीचे शिक्षक व विद्यार्थी तसेच बीएसपीएलचे शास्त्रज्ञ सहभागी होतील.

EDITION National

MEDIA Print

LANGUAGE Marathi